**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. /५२/२०२४**

सगुबाई रंगराव चेचर वगैरे १ वि. इंदूबाई रंगराव पाटील वगैरे १

**नि.नं. १०/लगत / सी**

**<u>उलटतपास वि. प तर्फे वकील श्री. एस.एम. रायबागकर यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरु,</u>**

१०. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी मुकदमा क्र. १५५/२०१४ हा मी वाचून घेतला होता. (साक्षीदारास नि. १७/१ या कागदयादीसह दाखल करण्यात आलेले कागदपत्र दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुळ दाव्यामध्ये ५७ गुंठे क्षेत्राचा उल्लेख नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुळ दावा परिच्छेद क्र. १ ते ५ यामध्ये २/३ हिश्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यामध्ये वादी यांना सामाईकात २/३ हिस्सेचा तुटक कब्जा मिळावा अशी विनंती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुळ दाव्याच्या विनंती कलमामध्ये मला ५७ गुंठे क्षेत्रा मिळावे असा उल्लेख नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझा सामाईकात २/३ हिस्सा मुळ दाव्यात मागणी नसताना देखील मी तशी मागणी केल्याबाबत खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये सदरचे प्रकरण हे वाटपाकरिता जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे केव्हा पाठविण्यात आले त्या तारखेचा तसेच त्या प्रकरणाचा क्रमांक व वर्ष यांचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरण हे वाटपाकरिता जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात आले होते याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी आजमितीपर्यंत दाखल केलेला नाही. सदर प्रकरणाबाबतचे कागदपत्र मी या कामी दाखल करणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाटप प्रकरण हे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात न आल्यामुळे त्याबाबतचा तपशील मी माझ्या अर्जात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाटप प्रकरण हे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात न आल्यामुळे तसा कागदोपत्री पुरावा मी या कामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये सदरचे प्रकरण हे

वाटपाकरिता जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे केव्हा पाठविण्यात आले त्या तारखेचा तसेच त्या प्रकरणाचा क्रमांक व वर्ष यांचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरण हे वाटपाकरिता उप अधीक्षक कार्यालय पन्हाळा यांचेकडे पाठविण्यात आले होते याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी आजमितीपर्यंत दाखल केलेला नाही. सदर प्रकरणाबाबतचे कागदपत्र मी या कामी दाखल करणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाटप प्रकरण हे उप अधीक्षक कार्यालय पन्हाळा यांचेकडे पाठविण्यात न आल्यामुळे त्याबाबतचा तपशील मी माझ्या अर्जात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाटप प्रकरण हे उप अधीक्षक कार्यालय पन्हाळा यांचेकडे पाठविण्यात न आल्यामुळे तसा कागदोपत्री पुरावा मी या कामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या खोटया अर्जास केवळ दुजोरा देण्याच्या हेतूने मी या कामी खोटी कथने केलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, उप अधीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा यांच्या कार्यालयाने मला मोजणीच्या नोटीसा पाठविल्या होत्या व त्या मी स्वीकारल्या होत्या. सदर मोजणीच्या नोटीसा मला गरज वाटल्यास मी या कामी हजर करेन.

**उलटतपास वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/–**

दि. १२/०८/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा